## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ७/०९/२०१२ रोजी सायंकाळी ३.३० वाजता आयोजित केलेल्या २४४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : २४४/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २४/०८/२०१२ रोजी झालेल्या २४३ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत...**

----------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सन्माननीय सदस्य प्रधान सचिव / नगर विकास विभाग यांनी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतातील बाब क्रमांक २४३/४ " प्रचलित किंमतीविषयक धोरणातील विविध बाबी अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या दरामधील सुधारणांबाबतचा प्रस्ताव " या विषयाच्या चर्चेत जमिनीच्या किंमतीवर म्हाडाने जमिन खरेदीवर गुंतविलेल्या रकमेवरील व्याजाव्यतिरिक्त अन्य आस्थापना खर्च इ. लावण्यात येऊ नये मात्र उर्वरित किंमतीविषयक बाबींबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असा निर्णय झाला होता त्याबाबतचा ठराव कार्यवृत्तांतात करणे आवश्यक असल्याचे व इतर मुद्दयांबाबतचा सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आणून दिले. यास इतरहि सन्माननीय सदस्यांनी दुजोरा दिला व बैठक क्रमांक २४३ च्या झालेल्या बैठकीतील बाब क्रमांक २४३/४ बाब टिप्पणीतील प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्राधिकरणाने

**ठराव क्रमांक : ६५७४** **दिनांक : ७/०९/२०१२**

**प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,**

**१. प्रचलित किंमतीविषयक धोरणातील विविध बाबी अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या शुल्कांच्या दरामधील सुधारणांबाबतच्या प्रस्तावात जमिनीच्या किंमतीवर म्हाडाने जमिन खरेदीवर गुंतविलेल्या रकमेवरील व्याजाव्यतिरिक्त अन्य आस्थापना खर्च, नफा इ. लावण्यात येऊ नये यास मंजूरी देण्यात आली.**

**सदर ठरावची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.**

**बाब क्रमांक : २४४/२**

**विषय :- म्हाडाने संपादित केलेल्या उपकरप्राप्त इमारती व त्या खालील भूखंडांच्या पुर्नविकासाबाबतचे धोरण निश्चित करणेबाबत.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५७५** **दिनांक - ७/०९/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

अ) मंडळाने ज्या ९ योजनांना संयुक्त पध्दतीने पुनर्विकास करण्यासाठी विकासकांना देकारपत्र दिले आहेत, त्याचा १ वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. त्यामुळे मंडळाने प्रदान केलेले देकारपत्र हे रद्द करण्यांत यावे. तसेच जोपर्यंत संयुक्त पुनर्विकासाबाबत प्राधिकरण / शासन स्तरावर निर्णय होत नाही, तोपर्यंत या ९ प्रकरणांमध्ये मंडळातर्फे पुढील कोणत्याही परवानग्या देण्यांत येऊ नयेत.

ब) ज्या ५ योजनांना शासनच्या गृहनिर्माण विभागाने दिलेल्या आदेशानुसार मंडळाने अंतिम ना हरकत प्रमाणपत्र किंवा देकारपत्र दिली आहेत, याबाबत शासन स्तरावर जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत मंडळातर्फे पुढील कोणत्याही परवानग्या देण्यांत येऊ नयेत.

क) ज्या २ प्रकरणी संपादित केलेल्या भूखंडाचे क्षेत्र ४००० चौ.मी.पेक्षा जास्त आहे, त्यांचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) अंतर्गत करण्याच्या दृष्टीने मंडळाने ज्या विकासकांना उच्च अधिकार समितीकडे प्रस्ताव सादर करण्यास मंजुरी दिली आहे, अशा प्रकरणांमध्ये शासन स्तरावर जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत मंडळातर्फे पुढील कोणत्याही परवानग्या देण्यांत येऊ नयेत.

ड) ज्या ३ पुनर्विकास योजना न्यायालयीन प्रकरणांमुळे प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये जोपर्यंत न्यायालयाचा अंतिम निर्णय लागत नाही, तोपर्यंत सदर प्रकरणांमध्ये कोणताही निर्णय घेण्यात येऊ नये.

इ) ज्या ३ योजनांमध्ये म्हाडाने संपादित केलेल्या भूखंडाचे क्षेत्र हे एकूण भूखंडाच्या दर्शनी किंवा मागील बाजूस आहे, अशा भूखंडाचा पुनर्विकास म्हाडा व लगतच्या खाजगी मालमत्ताधारका सोबत संयुक्त विद्यमाने करण्याबाबतचा निर्णय प्राधिकरण/शासन स्तरावर होत नाही, तोपर्यंत सदर प्रकरणी मंडळातर्फे पुढील कोणतीही कार्यवाही करण्यांत येऊ नये.

**उपरोक्त सर्व प्रकरणांमध्ये म्हाडाने संपादित केलेल्या भूखंडांचा पुनर्विकास हा मंडळातर्फे किंवा संयुक्त विद्यमाने करण्याबाबतचा अंतिम निर्णय किंवा निश्चित धोरण हे प्राधिकरणातर्फे आगामी बैठकीत किंवा कालांतराने सर्व बाबींची पडताळणी केल्यानंतर गुणवत्तेवर घेण्याचे ठरले.**

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४४/४**

**विषय :- पुणे मंडळांतर्गत ताथवडे, ता.मुळशी येथील योजनेचे काम बी.जी.शिर्के कंस्ट.टेक्नो. प्रा.लि. यांना थेट पध्दतीने देण्याबाबत.**

----------------------------

**ठराव क्रमांक : ६५७६** **दिनांक : ७/०९/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मौजे ताथवडे ता.मुळशी, जिल्हा पुणे येथे म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गंत खरेदी केलेल्या जमिनीवर सुमारे ५७६०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या मोकळया भूखंडावर नियोजित प्रकल्प विनाविलंब राबविणेकरीता पुणे मंडळातील पॅनेलवरील वर्ग १ चे नामांकित वास्तुशात्रज्ञ त्वरित नेमण्यात यावा व वास्तुशात्रज्ञ नेमण्याचे संपूर्ण अधिकार मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात येत आहेत, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक :  २४४/५**

**विषय :-  स.क्र.२००/१ व भुसावळ जि.जळगांव येथे ४७ गाळे मध्यम उत्पन्न गट सदनिकांचे बांधकाम - निविदा मंजूर करणेबाबत.**

----------------------------

**ठराव क्रमांक :  ६५७७**  **दिनांक  -  ७/०९/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, सर्व्हे क्र.२००/१, भुसावळ येथे ४७ गाळे मध्यम उत्पन्न गट सदनिकांच्या बांधकामासाठी निम्नतम निविदाकार व्ही.पी.भंडारी यांनी प्रस्तावित केलेला दरसूची २००८-०९ चा दर हा मुख्य अभियंता-३/प्रा. यांचेशी झालेल्या वाटाघाटीनंतर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ४६% अधिक आहे.  सदर दर हा चालू दरसूची २०११-१२ नुसार  २८.३०% जादा आहे.  सदर दर हा संयुक्तिक नसल्याने निम्नतम निविदाकार श्री.व्ही.पी.भंडारी यांनी भरलेली निम्नतम निविदा रद्द करण्यास व तदनंतर फेरानिविदा मागविण्यात प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४४/६**

**विषय :- गोराई रोड, बोरिवली येथील एफ.पी.क्र.४५७, टि.पी.एस.III वरील संक्रमण शिबीराचा एकत्रित पुनर्विकास संयुक्तीकरिता गोराई रोड अष्टविनायक हौ.सो.लि.व मे.साईली डेव्हलपर्स प्रा.लि. यांच्या सोबत करण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६५७८** **दिनांक - ७/०९/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

१ यापुर्वी दिनांक २०/०९/२०१० रोजी प्राधिकरणाने ठराव क्र. ६४९५ प्रमाणे मंजूर केलेल्या प्रस्तावामध्ये **'' २०४०० चौ.मि.चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध होणार होता. ( २६५२०.५० चौ.मि.बांसधकाम क्षेत्रफळ ) व त्यापैकी २९९७.५५ चौ.मि.बांधकाम क्षेत्रफळासाठी म्हाडाने बांधकाम खर्च रु. ४.५० कोटी विकासकास देणे प्रस्तावित होते ''** यात अंशतः बदल करुन **'' फंजीबल चटई क्षेत्रनिर्देशांकासह २९३३२.९६ चौ.मि.चटईक्षेत्र निर्देशांक ( ३८१३२.८५ चौ.मि.बांधकाम क्षेत्रफळ ) विनामुल्य बांधकाम करण्याचे अटीवर मंजूरी देण्यात येत आहे.''**

२ सुधारीत खालील परिशिष्ट अ नुसार एकूण उपलब्ध होणा-या बांधकाम क्षेत्रफळापैकी विकासकाने २७% बांधकाम क्षेत्रफळ म्हाडाला विना मोबदला बांधून हस्तांतरीत करणे याबदल्यात विकासकास एकूण उपलब्ध होणा-या बांधकाम क्षेत्रफळापैकी ७३% बांधकाम क्षेत्रफळ वापरण्यास मंजूरी देत आहे.

**परीशिष्ठ - अ**

| अ.क्र. | तपशिल | प्राधिकरण ठराव क्र. ६४९५ प्रमाणे आकडेमोडीनूसार प्राप्त होणारे क्षेत्रफळ चौ.मी. | अंशतः सुधारणासह आकडेमोडीनूसार प्राप्त होणारे क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| १. | एकूण बांधकाम क्षेत्रफळ (८०४७४.५३ x १.१७) | ९४,१५५.२० | ९४,१५५.२० |
| २. | बांधकाम क्षेत्रफळामधील | २११८४.९२ | २५,४२१.९० चौ.मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | म्हाडाचा हिस्सा | **(२२.५०%) व २९९७.२० चौ.मी. (रु. ४.५० कोटी बांधकाम खर्च अदा केल्यानंतर उपलब्ध होणारे बांधकाम क्षेत्र.)** | **(२७.०० %) (४५० चौ.फूटाचे ५२० गाळे ) + ३५% Fungible च.क्षे.नि.चे ७६०४.८५ चौ.मी.( ३८० चौ.फूटाचे १८२ गाळे)** |
| ३ | बांधकाम क्षेत्रफळामधील विकासकाचा हिस्सा | ७२,९७०.२८ चौ.मी. **(७७.५०%)** | ६८,७३३.३० चौ.मी. (७३.००%) |
| ४ | च.क्षे.नि. मधील म्हाडाचा हिस्सा | **२०४००.०० चौ.मी. च.क्षे.नि. (२६५२०.५० चौ.मी. ३.५० Index प्रमाणे बांधकाम क्षेत्र )** | **२१७२८.१२ चौ.मी. च.क्षे.नि.चे + ७६०४.८४ चौ.मी. Fungible च.क्षे.नि.चे एकूण २९३३२.९६ चौ.मी. (३.८८ Index प्रमाणे )** |

३ जोडपत्र ब अनुसार सादर केलेल्या त्रिपक्षीय करारनाम्यात वरीलप्रमाणे बदल करुन मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेने 'नविन गोराई रोड' एफ.पी. क्रमांक ४५७, टि.पी.एस.III, बोरीवली पश्चिम या वसाहतीतील म्हाडाच्या मालकीच्या संक्रमण शिबीराचा पुनर्विकास संयुक्तीकरित्या अभिन्यासातील २३ इमारतींच्या युनियन, विकासक (गोराई रोड अष्टविनायक हौ. यु. लि व मे.साईली डेव्हलपर्स प्रा.लि. ) व मुंबई मंडळ यांच्यात करण्याबाबत प्राधिकरण मंजुरी देत आहे.

४ सदर संयुक्त पुनर्विकास प्रकल्पात म.न.पाच्या परवानगी नुसार व वेळोवेळी होणा-या बदलानुसार योजनेबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

५ विकास नियंत्रण नियमावली (DCR)१९९१ च्या अध्यादेश क्र.सीएमएस/टिपीबी-४३११/४५२/प्र.क्र.५८/२०११/नवि-११, मंत्रालय मुंबई : ४०० ०३२, दि.०६ जानेवारी २०१२ नुसार उपलब्ध होणारा "Fungible FSI " चा वापर म्हाडा व विकासकाचा वाटयास येणा-या चटईक्षेत्रफळावर त्या त्या प्रमाणात वापरण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तथापी यासाठी लागणा-या सर्व परवानग्या विकासकास घ्यावयास लागतील व म्हाडाला सदरचे बांधकाम बांधून हस्तांतरीत करावयाची जबाबदारी सर्वस्वी विकासकाची राहील.

**<u>सदर प्रस्तावास खालील अटी व शर्तीस अधिन राहून मंजरूी देण्यात येत आहे.</u>**

१ सदर प्रस्तावात जमीन व बाांधकाम क्षेत्र विभागून म्हाडाच्या हिस्स्याची जमीन व बांधकाम क्षेत्र म्हाडास विनामुल्य प्राप्त होणेबाबत प्रस्तावित असल्यामुळे, नियमानुसार जमिनीचे अधिमूल्य अधिकचे आकारण्यात येऊ नये.

२ बांधकामाच्या काळात सध्याचे संक्रमण शिबीरातील व गाळेधारकांच्या पर्यायी जागेची व्यवस्था म्हाडामार्फत करण्यात येईल.

३ संक्रमण शिबीराचा गाळे तोडण्याचा खर्च सर्वस्वी विकासकाला करावा लागेल. गाळे तोडण्यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून होणार नाही.

४ विकासकाने सदर करारनाम्याच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आंत सर्व परवानग्या घेऊन १२ महिन्याच्या आंत बांधकामास सुरुवात करावी व याच तारखेपासून ३६ महिन्याच्या आंत बांधकाम सर्व बाबतीत पूर्ण करुन हस्तांतरीत करावे.

५ कोणत्याही अकल्पीत परिस्थितीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जादा वेळेची आवश्यकता असल्यास याबाबत मा. उपाध्यक्ष/प्राधि. निर्णय घेतील. जर मुदतवाढ देण्यांत आलेली नसेल, तर मुळ वेळापत्रक प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी गृहीत धरण्यात येईल.

६ प्रस्तावित बांधकामाचे भू अभिन्यास, बांधकाम नकाशे, इलेक्शन, तसेच स्पेसीफीकेशन इत्यादी बाबी मा. उपाध्यक्ष म्हाडाकडून बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी मंजूर करुन घ्यावे.

७ सदर प्रकल्पाबाबतची म्हाडाच्या हिस्साच्या बांधकामाची कार्यवाही, पूर्णत्वाची, तसेच स्पेसीफीकेशन विकासकाच्या बांधकामाच्या दर्जा प्रमाणे राखण्याची जबाबदारी विकासकाची असेल व याबाबत तसे क्षतीपूर्तीबंध पत्र विकासक म्हाडाकडे सादर करेल.

८ प्रकल्पाची प्रगती तसेच दर्जा याबाबत शहानिशा करण्यासाठी म्हाडाचे अधिकारी वेळोवेळी जागेस भेट देतील.

९ विकासक म्हाडाच्या अधिका-यांना जागा पाहणीच्या वेळी सर्व आवश्यक सहाय्य करेल. तसेच परिक्षणाचे नमूने निवडण्याबाबत सर्व आवश्यक सहाय्य करेल.

१० म्हाडास उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे निवासी वापरासाठीच वापरण्यांत यावे. म्हाडाला प्राप्त होणाऱ्या विनामुल्य बांधकाम क्षेत्रफळात प्राप्त होणारे निवासी गाळे, त्याचे क्षेत्रफळ व प्रकार ठरविणे, योजनेत प्राप्त होणारे क्षेत्रफळ अंतीमतः ठरविणे, तसेच तांत्रिक व इतर बाबतच्या अटी व शर्ती ठरविण्याचे व संयुक्त प्रकल्प यशस्वीरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने वेळोवेळी निर्णय घेण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांत येत आहेत.

११ म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार वार्षिक भुईभाडे आकारण्यांत यावे व त्यांची वसुली गाळे हस्तांतरणापूर्वी करण्यांत यावी.

१२ म्हाडास विनामूल्य उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे योजनेतील क्षेत्र मालमत्ता पत्रके, मुंबई महानगर पालिकेची मंजूरी, सर्वेक्षण, जागेवरील हद्द निश्चिती इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.

१३ संस्था /विकासक यांनी म्हाडा हिस्स्याचे काम, प्रथमता व प्राधान्याने करणे, आवश्यक राहील.

१४ भविष्यात जादा चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास यावर प्राधिकरणाची मालकी असेल. त्याचे वितरण विकासकास याच तत्वावर करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

१५ तसेच या योजनेसाठी भविष्यामध्ये २.५० पेक्षा जास्त चटईक्षेत्र निर्देशांक शासनाकडून मंजुर झाल्यास अशा जास्तीच्या बांधकाम क्षेत्रापैकी याच तत्वावर बांधकाम क्षेत्र म्हाडास विकासकाने मूळ प्रस्तावानुसार विनामुल्य बांधून देणे विकासकावर बंधनकारक राहील.

१६ याशिवाय इतर आवश्यक अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांत येत आहेत.

१७ उपरोक्त अटी व शर्तीशिवाय म्हाडाच्या जमीन वितरणाच्या इतर सर्वसाधारण अटी विकासकावर बंधनकारक राहतील.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४४/८**

**विषय :- स.क्र.१५/१, मौजा उमरखेड, अकोला या जमिनीवर उच्च उत्पन्न गटांतर्गत २१-अ टाईप रो हाऊसेस गाळयांच्या गृहनिर्माण योजनेच्या बांधकामाची निविदा स्विकृतीबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६५७९** **दिनांक - ७/०९/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

१. अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सर्वे क्र.१५/१ मौजा उमरखेड, अकोला या जमिनीवर उच्च उत्पन्न गटांतर्गत २१-अ टाईप रो-हाऊसेस गाळयांच्या योजनेच्या बांधकामाकरिता ( रुपये २,७८,५२,६७४/- या निविदारक्कमेवर ) प्राप्त झालेल्या निविदा देकारापैकी निम्नत्तम देकार देणा-या एम.एस.कन्स्ट्रोटेक प्रा.लि. कंपनीचा वाटाघाटीने ४.७५% ने जास्त असलेला तथा रु. २,९१,७५,६७६/- चा देकार प्राधिकरणाला प्रदान केलेल्या अधिकार प्रदानतेनुसार स्विकारण्यात येत आहे. प्राधिकरण मंजूरी देत आहे.

२. योजनेतील गाळयांचे बांधकाम तथा कामाचे कार्यादेश गाळयांच्या निश्चित मागणीला अनुसरुन देण्यात यावेत. मागणीनुसार द्यावयाच्या कार्यादेशाच्या पध्दतीसाठी कंत्राटदाराला कोणतीही जादा आकारणी अथवा कोणत्याहि सबबीखाली अतिरिक्त मोबदला अनुज्ञेय राहणार नाही जसे कीं, योजनेतील एकूण गाळयांची संख्या कमी असल्यास व जेवढी मागणी प्राप्त झाली आहे तेवढया मागणीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यामुळे कमी होणारे परिमाण आणि खर्च या कारणामुळे व अन्य कोणत्याहि सबबीमुळे मोबदला अनुज्ञेय राहणार नाही, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यांत यावी.

**बाब क्रमांक : २४४/९**

**विषय :- विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत करण्यात येणा-या पुनर्विकास योजनेमधील जे भोगवटाधारक नव्याने बांधण्यात आलेल्या पुनर्वसन सदनिकांचा ताबा घेण्यास पुढे येत नाहीत किंवा सहकार्य करीत नाहीत अशा पुनर्वसन सदनिकांबाबत मंडळातर्फे करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५८०** **दिनांक - ७/०९/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत जुन्या उपकरप्राप्त व विना उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासातून उपलब्ध होणा-या ( ३०० ते ७५० चौ.फुट ) इतक्या चटई क्षेत्राच्या सदनिकांचा ताबा घेण्यास जे भाडेकरु / मुळ भोगवटादार नकार देतात / वितरीत करण्यात आलेल्या गाळयांचा ताबा घेत नाहीत त्यांना ठराविक कालावधी द्यावा व त्या कालावधीत संबंधित गाळेधारकाने पुर्नवसित गाळयांचा ताबा न घेतल्यास, त्याचा गाळयाबाबतचा हक्क डावलण्यात येईल व त्याला वितरीत केलेला गाळा म्हाडा ताब्यात घेईल, अशा आशयाचे वृत्तपत्रात निवेदन द्यावे जेणेकरुन असहकार्य करणारे भाडेकरु / रहिवाशी सत्वर गाळे ताब्यात घेतील. अशा प्रकारचा नियम वि.नि.नि. ३३(१०) (एस.आर.ए.) मध्ये आहे. त्यानुसार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता सादर करण्यास प्राधिकरणाने मंजूरी दिली.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.